# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग


**जा.क्र.मनपा/पा.पु. व मलनि/1382/2024-25** **दि.27/09/2024**

**प्रति**,
जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय** :- प्रेसनोट महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे बाबत.

सोबत जोडलेली प्रेसनोट महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच सदर प्रेस नोट प्रसिद्ध केल्यानंतर या विभागास वृत्तपत्रांच्या प्रती पुरविण्यात याव्यात.

**(शरद नानेगांवकर)**
**कार्यकारी अभियंता**
**पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

प्रत :- सिस्टीम मॅनेजर
(वेबसाईट प्रसिध्दिकरीता)

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

### // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून 125 द.ल.ली. प्रतिदिन व स्टेम प्राधिकरणाकडून 80 द.ल.ली. प्रतिदिन तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून 1.5 द.ल.ली प्रतिदिन असा एकूण 206.5 द.ल.ली. प्रतिदिन पाण्याचा कोटा मंजूर आहे.

मात्र प्रत्यक्षात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून जवळपास सरासरी 117 द.ल.ली. प्रतिदिन स्टेम प्राधिकरणाकडून 75 द.ल.ली. प्रतिदिन व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून 0.5 द.ल.ली. प्रतिदिन असा एकूण सरासरी 192.5 द.ल.ली. प्रतिदिन पाणी पुरवठा होत आहे.

सदयाच्या शहराच्या लोकसंख्येनुसार दरडोई दरमाणसी 150 लिटर याप्रमाणे शहरास सुमारे 235 द.ल.ली. प्रतिदिन पाण्याची गरज आहे व प्रत्यक्षात 192.5 द.ल.ली.च पाणी पुरवठा होत असल्याने सदयस्थितीत सुमारे 42.5 द.ल.ली. प्रतिदिन शहराची पाण्याची मागणी व पुरवठा यामध्ये तफावत असून त्यामध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. कारण मिरा भाईंदर शहर हे मुंबई लगत आहे. तसेच विकसनशील शहर असल्याने शहरातील लोकसंख्येत झपाटयाने वाढ होत आहे. यास्तव शहरातील पायाभुत सुविधांवर प्रामुख्याने पाणी पुरवठा व्यवस्थेवर अधिकचा ताण येत असल्याने शहरातील पाण्याची मागणी व पुरवठा यामधील तफावतीमध्ये सतत वाढच होत आहे.

शहराची पाण्याची मागणी व पुरवठा यामध्ये खूपच फरक असल्याने शहरात अपुरा पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे शहरातील नागरीकांकडून तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून पाणी पुरवठयाबाबत वारंवार लेखी, दुरध्वनीद्वारे होणाऱ्या तक्रारीमध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. त्यामध्ये पाणी पुरवठा करणाऱ्या संस्थेकडून तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा बंद होत असतो, तो पुर्वपदावर येण्यासाठी जवळापास 48 तासांचा कालावधी लागतो. कारण मिरा भाईंदर शहर हे पाण्याच्या स्त्रोतापासून सुमारे 50 कि.मी. दुर तसेच पाणी पुरवठा योजनेच्या शेवटच्या टोकाला आहे. तसेच जर का पाणी पुरवठा करणाऱ्या दोन्ही संस्थांचा शटडाउन सलगच्या आठवडयात काही अपरिहार्य कारणास्तव घ्यावा लागल्यास अशा परिस्थितीत पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी लक्षणीय कालावधी म्हणजेच सुमारे तीन ते चार दिवसांचा कालावधी अपेक्षीत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन प्राप्त परिस्थितीत शहरातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अहोरात्र प्रयत्नशील आहे. त्यामुळे शहरातील पाणी पुरवठा काही अपवादात्मक परिस्थिती वगळता सुरळीत होत आहे. तसेच येऊ घातलेल्या नवरात्र व दिवाळी या सणासुदीच्या कालावधीत तसेच विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत शहरामधील पाणी पुरवठा सुरळीत राहण्यासाठी या कालावधीत शटडाउन न घेण्याबाबत तसेच महाराष्ट्र औद्योगिक

विकास महामंडळास मंजूर 125 द.ल.ली. मध्ये 5 द.ल.ली.ची वाढ करुन 130 द.ल.ली. पाणी पुरवठा करण्यासाठी व स्टेम प्राधिकरणास मंजूर 80 द.ल.ली. मध्ये 6 द.ल.ली.ची वाढ करुन 86 द.ल.ली. व बृहन्मुंबई महानगरपालिका यांना किमान मंजूर 1.5 द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याबाबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व व्यवस्थापकीय संचालक, स्टेम प्राधिकरण तसेच मा. अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका यांना मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी पत्राद्वारे विनंती केलेली आहे. तसेच स्टेम प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या दि.26/09/2024 रोजीच्या बैठकीमध्ये अध्यक्ष स्टेम प्राधिकरण तथा आयुक्त ठाणे महानगरपालिका यांनी व्यवस्थापकीय संचालक स्टेम प्राधिकरण यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेस किमान मंजूर कोटयानुसार पाणी पुरवठा करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे आगामी सणासुदीच्या काळात शहरातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे प्रशासनास शक्य होईल.

*****

शहर अभियंता